विशेष दिवाणी दावा क्र. ०७/२०२०
अजीत वि. युनियन ऑफ इंडिया

**आदेश नि.क्र. ३९ वर**

(CNR No. MHLA050001002020)

प्रतिवादी क्र.२ ने हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन कैफियत स्वीकारण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर वादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलांचे म्हणणे असे की, प्रतिवादीने विलंबाचे संयुक्तिक कारण अर्जात नमुद केलेले नाही. कायदयाप्रमाणे निश्चित केलेल्या मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही.

४. सदरचा दावा हा स्थावर मालमत्तेशी निगडीत असल्याने त्यामधील वादीचे कायदेशीर हक्क ठरवण्यासाठी या दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करुन घेतल्यास वादाचा पुर्णपणे निपटारा होण्यास मदत होणार आहे. यामध्ये वादीचे कांहीही नुकसान होणार नाही. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

प्रतिवादी क्र.२ यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ केला आहे व त्याची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेतले आहे.

**(प्र. अ. सवदीकर)**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.

दि.१२/०८/२०२१.